# वर्चस्वाची लढाई!

## ट्वेन्टी-२० विश्वचषकाच्या महाअंतिम लढतीत आज भारतासमोर तुल्यबळ दक्षिण आफ्रिकेचे आव्हान

**वृत्तसंस्था, ब्रिजटाऊन**

**एकीकडे २०१३** नंतर 'आयसीसी'च्या जागतिक स्पर्धेत जेतेपदाची प्रतीक्षा करणारा भारतीय संघ, तर दुसरीकडे आजवर कधीही विश्वचषक स्पर्धेत जेतेपदाची चव न चाखलेला दक्षिण आफ्रिकेचा संघ. दोन्ही संघांत क्रिकेटविश्वावर वर्चस्व गाजवण्याची क्षमता. त्यातच दोन्ही संघ अपराजित. दोन्ही संघांत तारांकितांची भरणा. आता हे दोन तुल्यबळ संघ आज, शनिवारी ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम लढतीत आमनेसामने येणार असल्याने जेतेपदासाठी कडवी झुंज पाहायला मिळणे अपेक्षित आहे.

रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ सलग दुसऱ्या वर्षी 'आयसीसी'च्या जागतिक स्पर्धेच्या अंतिम लढतीत खेळणार आहे. गेल्या वर्षी मायदेशात झालेल्या एकदिवसीय विश्वचषकातही भारतीय संघाने अंतिम फेरीचा टप्पा गाठला होता. ती स्पर्धा आणि आताची ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धा यातील भारतीय संघाच्या कामगिरीत बरेच साम्य आहे.

एकदिवसीय विश्वचषकात भारताने आपले सर्व सामने जिंकताना चाहत्यांना जेतेपदाचे स्वप्न दाखवले होते. मात्र, ऑस्ट्रेलियाचा अंतिम अडथळा पार करण्यात भारतीय संघ अपयशी ठरला होता. ट्वेन्टी-२० विश्वचषकात पावसामुळे भारताचा कॅनडाविरुद्धचा साखळी सामना रद्द करावा लागला. मात्र, त्या व्यतिरिक्त भारताने आपले सर्व सामने जिंकतच अंतिम फेरी गाठली आहे. त्यामुळे आता तरी भारतीय संघ आपली दशकभरापासून जेतेपदाची प्रतीक्षा संपवेल अशी चाहत्यांना आशा आहे. भारतीय संघाने आपली अखेरची 'आयसीसी' स्पर्धा २०१३ मध्ये चॅम्पियन्स करंडकाच्या स्वरूपात जिंकली होती.

दुसरीकडे, दक्षिण आफ्रिकेला आजवर केवळ एकदाच 'आयसीसी'ची स्पर्धा जिंकता आली आहे. त्यांनी १९९८ मध्ये चॅम्पियन्स करंडक (तेव्हाची 'आयसीसी' नॉक-आऊट करंडक) स्पर्धेचे जेतेपद मिळवले होते. मात्र, क्रिकेटच्या कोणत्याही प्रारूपातील विश्वचषक स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेने प्रथमच अंतिम फेरी गाठली आहे. एकदिवसीय आणि ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत मिळून तब्बल आठ वेळा उपांत्य फेरीत गारद झालेल्या दक्षिण आफ्रिकेच्या संघावर 'चोकर्स'चा शिक्का लागलेला आहे. मोक्याच्या क्षणी खेळ खालावत असल्याने त्यांना असे संबोधले जाते. मात्र, आता बार्बाडोस येथे होणारा अंतिम सामना जिंकून आपल्यावरील 'चोकर्स'चा शिक्का कायमचा पुसून टाकण्याची दक्षिण आफ्रिकेच्या संघाकडे संधी आहे. आता दक्षिण आफ्रिकेचा संघ ही संधी साधतो की भारतीय संघ आपले दुसरे ट्वेन्टी-२० विश्वविजेतेपद पटकावतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

- **वेळ : रात्री ८ वा.**
- **थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, २, १ हिंदी, हॉटस्टार ॲप.**
- **ठिकाण : केन्जिंग्टन ओव्हल, बार्बाडोस**

### खेळपट्टी कशी?

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील अंतिम लढत केन्जिंग्टन ओव्हल, बार्बाडोस येथे खेळवली जाणार आहे. या मैदानाची खेळपट्टी सामान्यतः सुरुवातीला वेगवान गोलंदाजांना मदत करते. हवेचा वेग चांगला असल्याने चेंडू स्विंग बऱ्यापैकी होतो. मात्र, काही षटकांनंतर फलंदाजांना अधिक मोकळेपणाने खेळता येते. या मैदानावर प्रथम फलंदाजी करताना १६० अशी सरासरी धावसंख्या आहे. भारताने या मैदानावर 'अव्वल आठ' फेरीत अफगाणिस्तानविरुद्ध सामना खेळला होता. त्यावेळी प्रथम फलंदाजी करताना भारताने ८ बाद १८१ धावा केल्या होत्या. मग अफगाणिस्तानला १३४ धावांत गारद केले होते.**

### पावसाचा अडथळा?

**या विश्वचषकात वेस्ट इंडिजमध्ये झालेल्या अन्य सामन्यांप्रमाणेच अंतिम सामन्यावरही पावसाचे सावट आहे. मात्र, कॅरेबियन बेटांवरील लहरी वातावरणामुळे सामना वेळेवर सुरू होण्याची आणि संपण्याची शक्यताही नाकारता येत नाही. पावसामुळे शनिवारी खेळ न होऊ शकल्यास, रविवार हा राखीव दिवस ठेवण्यात आला आहे.**

## भारतीय महिला संघाकडून विक्रमांचा पाऊस

**चेन्नई :** शफाली वर्माचे (१९७ चेंडूंत २०५ धावा) विक्रमी द्विशतक आणि तिने स्मृती मनधानासह (१६१ चेंडूंत १४९ धावा) दिलेल्या २९२ धावांच्या सलामीच्या बळावर भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्याच्या पहिल्याच दिवशी ४ बाद ५२५ धावांची विक्रमी मजल मारली. महिला कसोटी क्रिकेटमध्ये एका दिवसातील ही सर्वोच्च धावसंख्या आहे.

जेमिमा रॉड्रिग्जने ५५ धावांचे योगदान दिले. कर्णधार हरमनप्रीत कौर (नाबाद ४२) आणि रिचा घोष (नाबाद ४३) या दिवसअखेर मैदानावर होत्या.

# वित्तीय तूट ३ टक्क्यांवर

## चालू आर्थिक वर्षातील मेअखेरची स्थिती

**पीटीआय, नवी दिल्ली**

**केंद्र सरकारची** वित्तीय तूट चालू आर्थिक वर्षात मेअखेरीस ३ टक्क्यांवर नोंदविण्यात आली. लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या काळात वित्तीय तूट नियंत्रणात राहिल्याचे महालेखापालांनी (कॅग) जाहीर केलेल्या आकडेवारीतून शुक्रवारी समोर आले.

केंद्र सरकारचा खर्च आणि महसूल यातील तफावत म्हणजे वित्तीय तूट असते. गेल्या आर्थिक वर्षात पहिल्या दोन महिन्यांत वित्तीय तूट ११.८ टक्के होती. चालू आर्थिक वर्षात वित्तीय तूट सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) ५.१ टक्के म्हणजेच १६ लाख ८५ हजार ४९४ कोटी रुपये राहील, असा सरकारचा अंदाज आहे. महालेखापालांनी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, चालू आर्थिक वर्षात एप्रिल आणि मे महिन्यात वित्तीय तूट ३ टक्के म्हणजेच ५० हजार ६१५ कोटी रुपयांवर आली.

चालू आर्थिक वर्षात मेअखेरीस सरकारचा निव्वळ कर महसूल ३.१९ लाख कोटी रुपये असून तो अर्थसंकल्पीय उद्दिष्टाचा १२.३ टक्के आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत निव्वळ कर महसूल १३.९ टक्के होता. याचवेळी मेअखेरीस सरकारचा खर्च ६.२३ लाख कोटी रुपये असून, तो अर्थसंकल्पीय उद्दिष्टाच्या १३.१ टक्के आहे. गेल्या आर्थिक वर्षात याच कालावधीत तो १३.९ टक्के होता. आचारसंहितेच्या काळात सर्वसाधारणपणे सरकार नवीन प्रकल्पांवर खर्च करणे टाळते.

गेल्या आर्थिक वर्षात वित्तीय तूट जीडीपीच्या ५.६ टक्के होती. जास्त कर महसूल आणि कमी खर्चामुळे वित्तीय तूट नियंत्रणात येण्यास मदत झाली होती. केंद्राचे पुढील आर्थिक वर्षात वित्तीय तूट ४.५ टक्क्यांवर आणण्याचे उद्दिष्ट आखले आहे.

# एअरटेलकडूनही मोबाइल दरांमध्ये वाढ

**नवी दिल्ली :** रिलायन्स जिओच्या दरवाढीनंतर आघाडीची दूरसंचार कंपनी भारती एअरटेलने शुक्रवारी प्रीपेड आणि पोस्टपेड मोबाइल दरांमध्ये १० ते २१ टक्क्यांनी वाढ करण्याची घोषणा केली.

सुमारे अडीच वर्षांच्या कालावधीनंतर दूरसंचार कंपन्यांनी मोठी दरवाढ केल्यामुळे या निर्णयाला महत्त्व आहे. एअरटेलच्या विविध प्लॅनमध्ये १० ते २१ टक्क्यांपर्यंत दरवाढ करण्यात आली आहे. ही नवीन दरवाढ पुढील महिन्यात ३ जुलैपासून लागू होईल.

महागाईचा सामना करावा लागत असलेल्या ग्राहकांचा विचार करून कंपनीने मोबाइल दरांमध्ये अतिशय माफक वाढ केली आहे. ग्राहकांच्या खर्चात दररोज ७० पैशांपेक्षा कमी भर पडणार आहे.

### निर्देशांकांची ऐतिहासिक उच्चांकी झेप, मात्र नफावसुलीने सत्राअंती घसरण!

# 'सेन्सेक्स' ७९ हजारांच्या पातळीवर कायम

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

## 'रिलायन्स'चे बाजार भांडवल २१ लाख कोटींवर

**रिलायन्स इंडस्ट्रीजच्या बाजार भांडवलाने २१ लाख कोटी रुपये बाजार भांडवलाचा टप्पा ओलांडला आहे. शुक्रवारच्या सत्रात रिलायन्स इंडस्ट्रीजच्या समभागाने ३,१६२ कोटी रुपये ही ५२ आठवड्यातील ऐतिहासिक उच्चांकी पातळी गाठली. दिवसअखेर समभाग २.२८ टक्क्यांनी वधारून ३,१३०.८० रुपयांवर स्थिरावला. परिणामी कंपनीच्या बाजार भांडवलात शुक्रवारच्या सत्रात ४७,७७७.५७ कोटी रुपयांची भर पडून ते २१,१८,३०५ कोटी रुपयांवर पोहोचले आहे.**

**मुंबई :** जागतिक बाजारात सकारात्मक कल असूनही गुंतवणूकदारांनी बँकिंग, वित्त आणि ग्राहकोपयोगी वस्तू समभागांमध्ये केलेला विक्रीचा मारा, या परिणामी तीन सत्रांतील तेजीपासून फारकत घेत शुक्रवारी भांडवली बाजारातील प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टी निर्देशांक ओसरले. सकाळच्या सत्रात प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टी विक्रमी शिखरावर पोहोचल्यानंतर, गुंतवणूकदारांनी काही समभागांमध्ये नफावसुलीला सुरुवात केली.

सप्ताहअखेर शुक्रवारी सेन्सेक्स २१०.४५ अंशांच्या घसरणीसह ७९,०३२.७३ पातळीवर स्थिरावला. दिवसभरात, तो ४२८.४ अंशांनी वधारून ७९,६७१.५८ या नवीन विक्रमी शिखरावर पोहोचला होता. दुसरीकडे निफ्टीने ३३.९० अंश गमावले आणि तो २४,०१०.६० पातळीवर बंद झाला. दिवसभरात, त्याने २४,१७४ या सार्वकालीन उच्चांकाला स्पर्श केला. मात्र प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स ७९,००० अंश आणि निफ्टी २४,००० अंशांच्या पातळीवर कायम आहेत. गेल्या चार सत्रांत सेन्सेक्सने २,०३३.२८ अंश म्हणजेच २.६३ टक्क्यांनी उसळी घेतली.

आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाबाबतचा आशावाद आणि सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) अंदाजात सुधारणा यामुळे भांडवली बाजारात गती कायम आहे. परदेशी गुंतवणूकदारांच्या पुनरागमनामुळे बाजारात उत्साह संचारला असून त्यांनी लार्जकॅप कंपन्यांच्या समभाग खरेदीला प्राधान्य दिले आहे.

AURIC

**MAHARASHTRA INDUSTRIAL TOWNSHIP LIMITED**
(formerly known as Aurangabad Industrial Township Limited)
(A Govt. Undertaking)
Regd. Office – 'Udyog Sarathi' DMIC Cell, MIDC Office, Mahakali Caves Road, Andheri (E), Mumbai – 400 093 Tel. No. 022- 26879956,
Website :www.auric.city CIN: U74999MH2014SGC260132

**NOTICE FOR INVITING e-TENDER**

MITL invites online e-tenders for the following work:
E-Tender for Supply, Implementation, Testing and Commissioning (SITC) on EPC basis of 11 KV/LT Underground Cables, LT Feeder pillars and 11/0.4 KV Compact substations and Erection of 11 KV RMUs for PAP Plots in Auric-Shendra Industrial Area, Chhatrapati Sambhaji Nagar, Maharashtra.

The tender documents and other details can be downloaded from https://aitl.eproc.in and www.auric.city.

1. Last date and time of submission of tender through website is up to 15.00 Hrs. on 18 th July 2024 and Technical bids will be opened on the same day at 16.30 Hrs. Pre-Bid meeting for MITL/SBIA/2024-25/018 will be held on 5 th July 2024 at 11:30 hrs at MITL office, Mumbai.
2. Cost of Request for Proposal (RFP No MITL/SBIA/2024-25/018) is Rs. 59000/- including GST.

Further clarification / corrigendum in this regard, if any, will be put up on https://aitl.eproc.in
**Place:- Mumbai** **Joint MD MITL**



LIC HFL
LIC HOUSING FINANCE LTD

**एलआयसी हौसिंग फायनान्स लि.**
बॅक ऑफिस : ''जीवन श्री'', ११०९, विद्यापीठ रोड, शिवाजीनगर, पुणे ४११०१६, महाराष्ट्र

**मागणी नोटीस**

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (सरफेसी ॲक्ट) च्या सेक्शन १३(२) मधील अंतर्गत सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल २००२ चा रूल ३(१) सह**

जसे की, खाली सही करणार **एलआयसी हौसिंग फायनान्स लिमिटेड (एलआयसीएचएफएल)** चे अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३ (२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या सेक्शन १३ (१२) व रूल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करुन खालील कर्जदार/जामिनदार यांना मागणी नोटीस बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत नमूद केलेली येणे असलेली एकूण रक्कम सदर नोटीस प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत परत करावी. विविध कारणास्तव ह्या नोटीसेस संबंधित कर्जदार/मालमत्ताधारक/जामिनदार यांच्या पर्यंत पोचू शकल्या नाहीत. या नोटीसींच्या प्रती खाली सही करणार यांच्याकडे उपलब्ध आहेत आणि संबंधित कर्जदार/मालमत्ताधारक/जामीनदार त्यांच्या इच्छेनुसार खाली सही करणार यांच्याकडून कामाच्या कोणत्याही दिवशी कार्यालयीन वेळेत घेऊन जाऊ शकतात. परंतु, संबंधित कर्जदार यांना नोटीस देण्यात येते की त्यांचा जसा संबंध असेल त्यानुसार तो/ती किंवा त्यांचा वारस यांना ज्यांना लागू असेल त्यांनी ही नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत नोटीशीत नमूद केलेली रक्कम अधिक त्यावरील रक्कम जमा करण्याच्या तारखेपर्यंत होणारे व्याज, त्याचप्रमाणे कर्जाच्या आणि इतर करारानुसार तसेच संबंधितांनी केलेल्या करारानुसार अशी सर्व रक्कम एलआयसी हौसिंग फायनान्स लिमिटेड यांना परत करावीत. कर्जदारांच्या सुरक्षेसाठी आणि करारातील अटींनुसार कराराची कागदपत्रे व खाली नमूद केलेली मालमत्ता **एलआयसी हौसिंग फायनान्स लिमिटेड** यांच्याकडे गहाण ठेवण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव व पत्रव्यवहारासाठी पत्ता | गहाण मालमत्तांचा तपशिल | मागणी नोटीशीची तारीख | मागणी रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | सौ. मंगल शेणफड भाले (कर्जदार) श्री. शेणफड भागाजी भाले (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र.: ६२०६०००६७०४ | गाव मुकुंदवाडी, सिडको, नवीन औरंगाबाद, जिल्हा औरंगाबाद महाराष्ट्र ४३१००१ येथील सर्व्हे क्र. १७ (भाग) बांधण्यात आलेल्या पहिला मजल्या वरील सदनिका क्र. एन-१५-सी-४४/०६ | १०.०५.२०२४ | १५,२९,५७४.७१ |
| २) | श्री. सुभाष बाळा गायकवाड (कर्जदार) सौ. कडूबाई सुभाष गायकवाड (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र.: ६२०८०००११९८५ | गाव वलवाडी, जिल्हा धुळे, महाराष्ट्र ४२४००१ येथील सर्व्हे नं. ४/१/१ मधील प्लॉट नं. ५ए वर बांधण्यात आलेला रो हाऊस क्र. बी (पश्चिम बाजू) तळ + पहिला मजला. | १०.०५.२०२४ | २२,३०,११०.५२ |
| ३) | श्री. विशाल सुरेश श्रीखंडे (कर्जदार) आणि सौ. प्रियांका विशाल श्रीखंडे (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. ६२०८०००१२२४९ | गाव भुसावळ जि. जळगाव, महाराष्ट्र ४२५२०१ येथील सर्व्हे क्र. ७६/५ मधील प्लॉट नं. ४९ च्या पूर्व दक्षिण कोपऱ्यासह त्यावरील दुमजली बांधकाम | २८.०५.२०२४ | १७,०७,८४४.०८ |
| ४) | श्री. तुषारसिंग मदनसिंग राजपूत (कर्जदार) सौ. कल्पलता मदनसिंग राजपूत (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. ६२०८०००५६७० | गाव पिंप्राळा झोन नं. ८/२८१ जि. जळगाव, महाराष्ट्र येथील गट नं. १३/१/१/२ पैकी प्लॉट नं. १० च्या दक्षिण बाजूचे क्षेत्र तसेच मोकळी जागा आणि त्यावरील दुमजली ब्लॉक. | २८.०५.२०२४ | २२,१७,१५९.८५ |
| ५) | श्री. धनंजय गोपाळ कोळी (कर्जदार) सौ. विश्लेषा धनंजय कोळी (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र.: ६२०८००००८०३६ | गाव पिंप्राळा जि. जळगाव, महाराष्ट्र येथील गट नं. ३४१/१ वरील प्लॉट नं. ०५ पैकी दुमजली ब्लॉक नं. १ याचे दक्षिण बाजूचे क्षेत्र | २८.०५.२०२४ | १६,१४,३९४.८० |
| ६) | श्री. किशोर नाथू सूर्यवंशी (कर्जदार) सौ. प्रतिभा किशोर सूर्यवंशी (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र.: ६२०८०००११२३१ | गाव महिंदळे, जिल्हा धुळे, महाराष्ट्र ४२४००१ येथील सर्व्हे नं. ५३, सीटीएस नं. ३५१६ मधील प्लॉट नं. ९४ बांधकामासह | १०.०५.२०२४ | ११,२५,१६२.४० |
| ७) | सौ. मिर्झा अनवर बेग (कर्जदार) कर्ज खाते क्र.: ६२०६००००२०२६ | गाव औरंगाबाद शहर, जिल्हा औरंगाबाद महाराष्ट्र ४३१००१ येथील म्युनिसिपल नं. २-८-४१, शिट नं. १४ आणि १९, सीटीएस नं. ११३८४ वरील हिरा अव्हेन्यू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पातील स्टिल्ट पहिला मजल्या वरील फ्लॅट नं. ०५ | ०८.०५.२०२४ | १९,१८,४३८.३० |
| ८) | सौ. वैशाली विजय चौधरी (कर्जदार) श्री. विजय नवल चौधरी (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र.: ६२०८००००९४९१ | गट क्रमांक १७५ पैकी प्लॉट क्रमांक २, आणि पूर्व बाजूच्या ब्लॉक नं. १ (एक) वरील बांधकाम, गाव सावखेडे बुद्रुक, जिल्हा जळगाव, महाराष्ट्र ४२५००१ | १४.०५.२०२४ | २६,०९,२७६.९५ |
| ९) | श्री. रोहन हाडोळे (कर्जदार) कर्ज खाते क्र: ६२१७०००००८४९ | गाव नालेगाव, जि. अहमदनगर, महाराष्ट्र ४१३५२४ येथील सर्व्हे नं. ७६/१ हिस्सा नं. २ मधील प्लॉट नं. ३ वर बांधण्यात आलेल्या ड्रीम सिटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पात विंग-सी मधील स्टिल्ट पाचवा मजल्यावरील फ्लॅट नं. सी-६०१ | १०.०५.२०२४ | ११,२५,१६२.४० |

जर संबंधित **एलआयसी हौसिंग फायनान्स लि.** ला सदर रक्कम परत करण्यास असफल ठरले तर, वर नमूद केलेल्या तारण मालमत्तेच्या संदर्भात सदर कायदा कलम १३(४) आणि लागू होणारे रूल्स यांसह संबंधित कर्जदार यांच्या खर्च आणि परीणामांसह जोखमीवर कारवाई करण्याचा **एलआयसी हौसिंग फायनान्स लि.** ला अधिकार आहे. सरफेसी ॲक्ट मधील तरतुदीनुसार संबंधित कर्जदार / जामीनदार यांना सदर मालमत्ता, कोणत्याही प्रकारे विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य मार्गाने **एलआयसी हौसिंग फायनान्स लि.** च्या लेखी अनुमतीशिवाय हस्तांतरीत करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. सदर तरतुदींचा भंग केल्यास सदर व्यक्ती सरफेसी ॲक्टमधील तरतुदींनुसार शिक्षा आणि / किंवा दंडास पात्र ठरेल.

**दिनांक : २९.०६.२०२४** **सही /- अधिकृत अधिकारी**
**ठिकाण : औरंगाबाद, जळगाव, धुळे** (मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा) **एलआयसी हौसिंग फायनान्स लि.**



यूनियन बैंक Union Bank of India

**क्रेडिट रिकव्हरी ॲण्ड लिगल सर्व्हिस डिपार्टमेंट**
**क्षेत्रिय कार्यालय :** दि कॅपीटल बिल्डींग, पहिला मजला, कुलकर्णी गार्डन समोर, शरणपूर रोड, नाशिक-४२२००५. दूरध्वनी क्र.(०२५३)२३१७७७१

**विक्री सुचना**
**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी**

**सिक्युरिटी इंटरेस्ट(एन्फोर्समेंट) रूल्स,२००२ चे नियम ८(६) सह वाचले जाणारे दि. सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२, नुसार अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

तमाम जनतेस आणि विशेषतः कर्जदार व जामिनदार यांना याद्वारे सुचित करण्यात येते की, सिक्युअर्ड क्रेडिटर म्हणजेच **युनियन बँक ऑफ इंडिया** यांचेकडे संरक्षीत तारण/बोजा असलेली खालील नमूद अचल मालमत्ता ज्याचा ताबा **युनियन बँक ऑफ इंडिया** अधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे, सदरील मालमत्ता खाली दिल्यानुसार **'जशी आहे तशी' 'जी काय आहे ती'** आणि **'जी काय तेथे आहे ती'** या तत्त्वावर **युनियन बँक ऑफ इंडिया** सिक्युअर्ड क्रेडिटर्स खालीलप्रमाणे व्याजासह वसुलीसाठी **युनियन बँक ऑफ इंडिया यांनी दि. १६.०७.२०२४ रोजी विक्रीस काढलेली** आहे. मालमत्तेचा तपशील, राखीव किंमत, अनामत ठेव रक्कम, खालीलप्रमाणे आहे.

| शाखा | कर्जदार/जामिनदारांचे नाव | मालमत्तेचा तपशिल | राखीव किंमत | अनामत ठेव रक्कम | ताबा घेतल्याचा प्रकार | थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| मुंबई नाका शाखा जि.नासिक | कर्जदारः मे. इच्छामणी एंटरप्रायझेस, प्रोप्रा. श्री. आशुतोष श्रीनिवास चंद्रात्रे, जामिनदारः श्री. श्रीनिवास वसंतराव चंद्रात्रे | फ्लॅट नं.१२, दुसरा मजला, गंगोत्री अपार्टमेंट, बँक ऑफ इंडिया व स्वस्तिक गेस्ट हाऊस जवळ, इंद्रकुंड, पंचवटी, नाशिक-४२२०११. येथील मालमत्तेचा सर्व भाग व पार्सल. मोजमापीत ४१.७५ स्क्वे.मी. चतुःसिमाः उत्तर बाजू- फ्लॅट नं.१०, दक्षिण बाजू- प्रिन्स पॅलेस बिल्डिंग, पुर्व बाजू- जिना व फ्लॅट नं.१४, पश्चिम बाजू- ४० फुट रूंद रस्ता | Rs. 11,16,000/- | Rs. 1,16,000/- | प्रत्यक्ष ताबा | Rs. 17,18,108.74/- ३०.०४.२०२४ रोजी पुढील व्याज, खर्च आणि खर्चासह |

- **सिक्युअर्ड क्रेडिटरला जडजोखिम माहिती असल्यास बोजाचा तपशीलः** NA
- **अनामत ठेव रक्कम जमा करण्याची अंतिम तारीखः** १५.०७.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी संध्याकाळी ५ वा.
- **लिलावाची तारीख व वेळ :** १६.०७.२०२४, दुपारी १२ ते ५ (१० मिनिट अमर्यादीत ऑटो एक्स्टेंशनसह)

विक्रीसाठीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी कृपया वेबसाईटवर दिलेल्या लिंकचा वापर करावा **www.unionbankofindia.co.in** किंवा **https://www.ibapi.in** लिंकचा वापर करावा. नोंदणी, लॉगिन आणि बिडींग नियमांसाठी **https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/index.jsp** भेट द्या.

**दिनांक : २९.०६.२०२४ । ठिकाण : नाशिक** (टिप : स्वैर भाषांतर, तफावत असल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य) **सही/- अधिकृत अधिकारी युनियन बँक ऑफ इंडिया**



kotak

**कोटक महिंद्रा बँक लिमीटेड**
नोंदणीकृत कार्यालय : 27 बीकेसी, सी 27, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (ई.), मुंबई - 400 051.
कॉर्पोरेट आयडेंटिटी नं. L65110MH1985PLC038137). **क्षेत्रिय कार्यालय :** चौथा मजला, अदमस प्लाझा, सीएसटी रोड, कोलीवेरी गाव, कुंचझी कुर्वे मार्ग, कलीना, सांताक्रूज (पुर्व) मुंबई-400098

**लिलाव व विक्रीसाठी जाहीर सूचना**

कृपया ही नवीन सूचना समजण्यात यावी ज्याद्वारे कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की कोटक महिंद्रा बँक लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष ताब्यात असलेल्या खाली नमूद अचल मालमत्तेची "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे" तत्त्वावर विक्री करण्यात येणार असून खालील तपशिलानुसार अचल मालमत्तेच्या आमचे ई-लिलाव सेवा पुरवठादार म्हणजे मे. सी१ इंडिया प्रा.लि. च्या www.c1india.com वेब पोर्टलच्या माध्यमातून प्रस्ताव आमंत्रित आहेत:-

**कर्ज खाते क्र. LAP17507275, 9011388176 कर्ज खातेदाराचे /जमानतदाराचे/गहाणदाराचे नावः- कांचन मोटर्स . 2. सरिता निशांत भुतडा, 3. निशांत प्रकाशचंद्र भुतडा, 4. प्रकाशचंद्र गंगाबिसन भुतडा, 5. कांचन प्रकाशचंद्रा भुतडा, 6. मॅजीक मोटर्स**
**मागणी सूचना दिनांक 13(2) सूचना दिनांक : 23.03.2018; मागणी सूचना रक्कम (13(2) सूचना रक्कम : रु. 9,75,86,636.51/- (रुपये नऊ कोटी पंच्याहत्तर लाख शहाऐंशी हजार सहाशे छत्तीस आणि एक्कावन पैसे फक्त) 23.03.2018 पर्यंत.**

| संपत्तीचे विवरण | राखीव किंमत | इसारा अनामत रक्कम | अचल संपत्तीकरीता निरीक्षण दिनांक | लिलावाची दिनांक/वेळ |
|---|---|---|---|---|
| प्लॉट नं. 408/3बी, कांचन मोटर्स, सर्वे नं. 408/3बी कनमवार ब्रिज जवळ, नाशिक, नाशिक मुंबई आग्रा रोड द्वारका नाशिक जवळ, महाराष्ट्र- 422001 | रु16,57,55,890/- (रुपये सोळा कोटी सत्तावन लाख पंचावन हजार आठशे नव्वद फक्त) | रु. 1,65,75,589/- (रुपये एक कोटी पासष्ठ लाख पंच्याहत्तर हजार पाचशे एकोणनव्वद फक्त) | 16.07.2024 स. 11 ते दुपारी 12 वाजता | 23.07.2024 दुपारी 02 ते दुपारी 03 वाजता |

प्रस्ताव/ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख : **22.07.2024** ला. वाढीव रक्कम : रु. **1,00,000/-** (रुपये एक लाख फक्त) सायंकाळी **5.00** पर्यंत.

**विक्रीच्या महत्त्वाच्या अटी व शर्ती:** १.सदर लिलाव बोली दस्तावेजात नमूद अटी व शर्ती आणि येथे दिलेल्या प्रक्रियेनुसार घेण्यात येत आहे. बोलीदार बोली दस्तावेज, ई-लिलावात काढण्यात आलेल्या अनामत मत्तेचे तपशील आणि ऑनलाईन सादर करावयाच्या बोली प्रपत्रासाठी आमचे ई-लिलाव सेवा पुरवठादार मे. सी१ इंडिया प्रा.लि. याच्या वेबसाईटला म्हणजे **https://www.bankeauctions.com** येथे भेट देऊ शकतात;
२. सर्व इच्छुक खरेदीदार / बोलीदारांनी वर नमूद वेब पोर्टलवर म्हणजे **https://www.bankeauctions.com** येथे आपले नाव नोंदविणे आणि वर नमूद दिनांक व वेळी सदर ई-लिलावात सहभागी होण्यासाठी स्वतःचा युजर आयडी व पासवर्ड जनरेट करणे आवश्यक आहे;
३.ई-लिलावाबाबत चौकशी, माहिती, सहायता, प्रक्रिया व ई-लिलावाच्या ऑनलाइन प्रशिक्षणासाठी संभाव्य बोलीदार **मे. सी१ इंडिया प्रा.लि.** आमच्या ई-लिलाव सेवा भागीदाराचा विभाग, **मे. विनोद चौहान, द्वारे टेली.क्र.: +९१ ७२९१९७११२४, २५, २६, मोबाईल क्र.: ९८१३८८७९३१** आणि ई-मेल आयडी: **delhi@c1india.com & support@bankeauctions.com** येथे संपर्क साधू शकतात;
४.प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार सदर मालमत्तेवर कोणतेही बोजे नाहीत. परंतु, इच्छुक बोलीदार आधीच वेळ तरवून कोणत्याही दिवशी व वेळी वर नमूद करण्यात आलेल्या मालमत्तेची व तिच्या कागदपत्रांची पाहणी करू शकतात आणि त्यांनी आपली बोली सादर करण्याअगोदर ई-लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तेच्या संदर्भात बोजे, मालकी हक्क इ. बाबत तसेच मालमत्तेवर परिणाम करू शकणारे दावे/ अधिकार / थकबाकी इ. बाबत स्वतंत्रपणे चौकशी करावी. सदर ई-लिलाव सूचना केएमबीएल कडून देण्यात येणारे वचन किंवा त्यांचे प्रतिनिधित्व नाही. सदर मालमत्तेची केएमबीएल यांना ज्ञात व अज्ञात अशा सर्व वर्तमान व भावी बोज्यांसह करण्यात येत आहे. तिसऱ्या पक्षाने दावा / अधिकार/थकबाकीची मागणी केल्यास त्यासाठी प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको कोणत्याही प्रकारे जबाबदार नसतील;
५.ई-लिलावात सहभागी होण्यासाठी इच्छुक खरेदीदार / बोलीदारास वेब पोर्टलवर **(https://www.bankeauctions.com)** 'कोटक महिंद्रा बँक लिमिटेड' यांचे नावे काढण्यात आलेल्या आणि नागपूर येथे देय असलेल्या अनामत मत्तेच्या व्याज-रहित बयाणा रकमेच्या भरण्याचा तपशील आणि कंपनी असल्यास वर नमूद केल्याप्रमाणे पॅन कार्ड, आधार कार्डची, निवासी पत्त्याच्या पुराव्याची, बोर्डाच्या ठरावाची आणि पत्त्याच